माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.१४९०/२२/त.क्र.१४० /२५/०१

श्री. सन्नी चव्हाण
रुम क्र.२३३, चाळ क्र.२०, गायकवाड नगर,
पी.वाय.थोरात मार्ग, चेंबूर, मुंबई – ४०००८९.

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.१)
एम/पूर्व विभाग एम/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,
सहाय्यक आयुक्त, एम-पूर्व यांचे कार्यालय,
म.तु. कदम मार्ग, गोवंडी, मुंबई-४०००४३.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता
एम/पूर्व विभाग एम/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,
सहाय्यक आयुक्त, एम-पूर्व यांचे कार्यालय,
म.तु. कदम मार्ग, गोवंडी, मुंबई-४०००४३.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.१२.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| तत्कालिन जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०९/१२/२०२१ रोजी पारित आदेशात गायकवाड नगर, पी.वाय थोरात मार्ग, चाळ क्रमांक १ ते २५ येथे झालेल्या गटाराच्या कामाबाबत २०० पृष्ठांची माहिती विनामूल्य देण्याबाबत व त्यानंतरची माहिती ही शुल्क आकारून देण्याचे आदेश देण्यात आले होते त्याचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवीत प्रस्तुत तक्रार अर्ज कलम १८ (एक) अन्वये दाखल करण्यात आला आहे.

आज झालेल्या सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अतुल कोल्हे यांनी या संदर्भातील सर्वच माहिती उपलब्ध असून ती आज तक्रारदारांना देण्यासाठी प्रदान करण्याच्या दृष्टीने आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध आहे असे नमूद करीत माहिती तात्काळ देण्याचे आश्वासित केले असून उपरोक्त आश्वासनाच्या अधीन राहून प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
सत्यमेव जयते

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.१२.२०२५**